मा. कुलगुरू कार्यालय
दिनांक :- १३-१०-२०१७

## निवडणूक २०१७

विविध संघटना, तसेच इतर प्राध्यापकांनी केलेल्या अपील अर्जानुषंगाने मा. कुलगुरू तथा निवडणूक अपील अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडून खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. सर्व प्राधिकरणांसाठी (प्राचार्य, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, अभ्यासमंडळ) जाहीर केलेल्या दुरुस्त मतदार याद्यांमध्ये (Corrected Electoral Roll) खालील निकषाधारे निर्णय घेण्यात येईल.

i. उपरोल्लेखित सर्व निर्वाचक गणांसाठी प्राप्त तदर्थ (Ad-hoc) अर्जदारांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.
उपरोल्लेखित सर्व निर्वाचक गणांमध्ये ज्या अर्जदारांनी तदर्थ (Ad-hoc) मान्यतापत्र जोडलेले आहे, परंतु सेवासातत्य आदेश काही कारणास्तव जोडावयाचा राहून गेलेला आहे, अशा सर्वांसाठी अपील करताना जर त्यांनी सेवासातत्य आदेश अपील अर्जासोबत जोडल्यास, त्या सेवासातत्य आदेशाची वैधता तपासून त्यांचे अर्ज वैध करण्यात येतील.

ii. तात्पुरती नियुक्तीचे आदेश, तासिका तत्त्वावरील नियुक्तीचे आदेश तसेच एकत्रित वेतनावरील नियुक्तीचे आदेश ग्राह्य धरले जाणार नाहीत.

iii. अर्जदाराची स्वाक्षरी, सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी, सक्षम प्राधिकाऱ्याचा शिक्का नसलेले अर्ज दि. २५-०९-२०१७ रोजी दु. ०४.०० वा. झालेल्या सुकाणू समितीच्या बैठकीत ठरलेल्या निर्णयानुसार अवैध ठरविण्यात येतील.

iv. 'विद्यापीठ अध्यापक' गटासाठी प्राप्त अर्जातील अर्जदारांनी अपील करताना जर त्यांचे परिविक्षाधीन नमूद असलेले आदेश (Probation period order) आणि सेवासातत्य नमूद असलेले आदेश अपीलासोबत जोडल्यास, अशा सर्व अर्जदारांचे अर्ज वैध ठरविण्यात येतील.

v. 'नोंदणीकृत पदवीधर' निर्वाचक गणासाठी महिला अर्जदारांच्या बाबतीत, अर्जावरील नाव पदवीवरील नाव आणि पत्त्याच्या पुराव्यावरील नाव (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एक पुरावा) जुळत नसल्यास, त्यांचे अर्ज अवैध मानण्यात येतील.

vi. 'नोंदणीकृत पदवीधर' निर्वाचक गणासाठी ज्या अर्जदारांचे निवासस्थान अर्जदारांनी दिलेल्या पत्त्याच्या पुराव्यानुसार (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एक पुरावा) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या अधिकारक्षेत्रातील नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली या जिल्ह्यांमधील असेल, तर त्यांचे अर्ज अवैध मानण्यात येतील.

vii. 'व्यवस्थापनाचे प्रतिनिधी' या गणासाठी ज्या अर्जदारांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असेल किंवा धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असेल किंवा धर्मादाय आयुक्तांकडे रीतसर पत्र नसलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

13/10/2017
मा. कुलगुरू 8 pm